## कर्मचा-याचे अंशदान परत करण्यासाठी द्यावी लागणारी कागदपत्रे

१. कर्मचा-याने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नावाने वैयक्तिक रक्कम मागणी अर्ज करावा.

२. कर्मचा-याचे १०० रु. चे स्टॅम्प पेपरवर पेन्शन ऐवजी रककम परत चे हमीपत्र ॲफ़ेडेव्हीट किंवा नोटरी करुन पाठवावे . (हमीपत्राचा नमुना खाली दिलेला आहे.)

३. बाजार समितीने कर्मचा-याला सेवा निवृत्त केलेबाबतचा बाजार समितीचा ठराव /आदेश पाठवावा. राजीनामा असल्यास राजीनामा मंजुर केलेला ठराव , बडतर्फ़ असल्यास सेवामुक्त केलेचा आदेश.

४. कर्मचा-याचे बॅकेचे खाते क्रमांक व नाव , बॅकेचे नाव , बॅक शाखेचे नाव , बॅकेचा आय एफ़ एस सी कोड क्रमांक इ. माहिती असलेली बॅकेच्या पासबुकची झेरॉक्स प्रत बॅकेचे आर टी जी एस करण्याकरीता द्यावी. ( शक्यतो एसबीआय बॅक असल्यास चांगले इतर हि बॅक चालेल.)

५. कर्मचा-याचे ओळखपत्र म्हणुन पॅनकार्ड / मतदान कार्ड / आधार कार्ड यापैकी १ द्यावे.

६. कर्मचा-याचा मोबाईल क्रमांक

७. कर्मचा-याचा फ़ोटो व नमुना सही बाजार समिती लेटर पॅडवर सचिवांनी प्रमाणित करुन पाठवावी.

८. बाजार समितीचे अंशदान परत करणे बाबत शिफ़ारस पत्र.

वरील सर्व कागदपत्रे तयार करुन बाजार समिती मार्फ़त पाठविण्यात यावीत.

# प्रतिज्ञापत्र

हमीपत्र लिहुन देतो /देते की , मी ......................... कृषि उत्पन्न बाजार समिती ................. जिल्हा ............... मधुन दिनांक ...................... रोजी .................................... या पदावरुन सेवानिवृत्त झालो/झाले आहे.

आपले कडील सेवानिवृत्ती वेतन योजनेच्या नियमानुसार व निकषांनुसार मी सेवानिवृत्ती वेतन मिळण्यास पात्र आहे. तथापि माझ्या वैयक्तिक घरगुती अडचणीमुळे मला योजनेकडे जमा असलेली बाजार समितीच्या हिश्श्याची रक्कम सेवानिवृत्ती वेतन न घेता एक रकमी परत घ्यावयाची आहे. प्रस्तुतचा निर्णय हा मी माझे अक्कलहुशारीने समजुन - उमजुन , कोणाच्याही दबावाला बळी न पडता अथवा कसल्याही प्रकारचे नशापान न करता घेतलेला आहे व तो माझे वाली वारसांना बंधनकारक आहे व राहील.

माझ्या या निर्णयानुसार योजनेकडे माझी जमा असलेली सर्व रक्कम योजनेच्या नियमानुसार मला परत मिळाल्यास भविष्य काळात मी व माझे वालीवारस सेवानिवृत्ती वेतन अथवा अन्य कसल्याही प्रकारची तक्रार अथवा कोर्टाचा विषय करणार नाही. म्हणुन प्रस्तुतचे हमीपत्र आज रोजी ......................... मुक्कामी लिहुन देऊन त्यावर स्वाक्षरी करत आहे.

तारीख

श्री/सौ/श्रीमती ....................................

हमीपत्र लिहुन देणार

(टिप :- सदर नमुन्यात रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर ॲफ़ेडेव्हीट करुन पाठविण्यात यावे .)